Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014

Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# बी. एड्. प्रशिक्षणाचा अध्यापन अभिवृत्ती यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.

रेखा भरत पाटील
श्री.सु. हि. नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय नवापूर जि. नंदुरबार

सारांश - अध्यापन कलेतील बारकावे लक्षात घेऊन वैज्ञानिक वृत्ती अंगात बाणून, प्रयोगशील व प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविणे हेच शिक्षक शिक्षणाचे उद्दिष्ट होय. हा दृष्टिकोन समोर ठेऊन शिक्षक-शिक्षणाच्या क्षेत्रात आवश्यकतेनुसार व बदलत्या कालमान परिस्थितीनुसार, परिवर्तन करणे गरजेचे आहे. शिक्षक-शिक्षण हा संपूर्ण शिक्षणपध्दतीचा कणाच आहे. कारण शिक्षणाची कोणतीही योजना, कोणतीही पध्दती, त्यात घडवून आणावयाचे बदल हे शिक्षकाच्या मदतीशिवाय घडून येणार नाहीत. म्हणून समाज, शिक्षणपध्दती व त्यातील अत्यंत क्रियाशील घटक म्हणजे शिक्षक हे तीनही घटक सारखेच गतिमान असावे लागतात.

प्रस्तावना-

शिक्षकाच्या व्यक्तीमत्वाचे पैलू खालीलप्रमाणे

निरोगी शरीरयष्टी, बुध्दिमत्ता, अभियोग्यता, अभिरुची, अभिवृत्ती, नेतृत्व, अध्ययनशीलता, क्रियाशीलता, वक्तृत्व यातील अनेक पैलूंची रुजवणूक बी. एड्. प्रशिक्षणाव्दारे विद्यार्थी शिक्षकांमध्ये केली जाते. वरील पैलूंमधील अभिवृत्तीवर बी. एड्. प्रशिक्षणाचा काय परिणाम होतो हे संशोधिकेला अभ्यासावयाचे आहे.

उद्दिष्टे :-

१) बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
१.१ बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
१.२ बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
१.३ बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी स्त्री आणिपुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
१.४ बी. एड्. प्रशिक्षणानंतरस्त्री आणिपुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

परिकल्पना :-

१) बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.
१.१ बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.
१.२ बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

१.३ बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी स्त्री आणिपुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

१.४ बी. एड्. प्रशिक्षणानंतर स्त्री आणि पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

न्यादर्श :-

नवापूर तालुक्यातील श्री. सुरुपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ६० विद्यार्थी शिक्षकांची निवड यादृच्छिक पध्दतीने केली.

संशोधन पध्दती :-

सर्वेक्षण पध्दत

संशोधनाची साधने :-

विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे मापन करण्यासाठी डॉ. श्रीमती. उम्मी कुलसुम यांच्या शिक्षकी व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन या अभिवृत्ती मापिकेचा उपयोग केला.

कार्यपध्दती :-

बी. एड्. प्रशिक्षण सुरू होण्यापूर्वी म्हणजेच विद्यार्थी शिक्षकांनी शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम व प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतल्याबरोबर ६० विद्यार्थी शिक्षकांकडून अध्यापन अभिवृत्ती चाचणी भरुन घेतली व वर्षाच्या शेवटी म्हणजे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर अध्यापन अभिवृत्तीचे मापन करण्यासाठी पुन्हा तीच चाचणी भरून घेतली व मिळालेल्या गुणांकांवरुन विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीवर शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम व प्रशिक्षणाचा होणारा परिणाम अभ्यासला.

संख्याशास्त्रीय तंत्र :-

मध्यमान, प्रमाण विचलन व t मूल्य या सांख्यकीय तंत्राचा विचार केला.

सामग्री विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

उद्दिष्ट क्रमांक. १ :- **बी. एड्.** प्रशिक्षणा**पूर्वी** आणि शिक्षणानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
परिकल्पना क्रमांक १ :- **बी. एड्.** प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात काही फरक दिसून येतो तो फरक लक्षणीय आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी tमूल्याचा वापर करण्यात आला. त्यासंदर्भातील माहिती सारणी क्रमांक १ मध्ये दिली आहे.

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014 Available online at www.aygrt.isrj.net

सारणी क्रमांक. १
**बी. एड. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे मध्यमान, प्रमाणविचलन व tमूल्य दर्शविणारी सारणी.**

| अभ्यास गट | संख्या (N) | मध्यमान (M) | प्रमाणविचलन (S.D.) | tमूल्य | प्राप्त tची सार्थकता / असार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| प्रशिक्षणापूर्वी (अभिवृत्ती) | ६० | १५०.१ | ११.५५ | ४.०७ | सार्थक (०.०५) |
| प्रशिक्षणानंतर (अभिवृत्ती) | ६० | १६०.१६ | १५.२६ | | सार्थक (०.०१) |

०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य - २.००
०.०१ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य - २.६६

अर्थनिर्वचन :-

सारणी क्रमांक. १ नुसार बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्ती प्राप्त tमूल्य ४.०७ आहे.

०.०५ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df) ५९ करिता नमुना tमूल्य २.०० आहे. प्राप्त tमूल्य (४.०७) हे नमुना t मूल्य (२.००) पेक्षा जास्त असल्याने प्राप्त t मूल्यसार्थक आहे.

तसेच ०.०१ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा df ५९ करिता नमुना tमूल्य २.६६ आहे. प्राप्त tमूल्य (४.०७) हे नमुना tमूल्यपेक्षा (२.६६) अधिक असल्याने प्राप्त tमूल्यसार्थक आहे.

परिकल्पना परीक्षण :-

०.०५ व ०.०१ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्यपेक्षा प्राप्त tमूल्य अधिक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग केला.

बी. एड्. प्रशिक्षणानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात वाढ झाली आहे.

निष्कर्ष :-

बी. एड्. प्रशिक्षणामुळे विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीत वाढ होते.

उद्दिष्ट क्रमांक. **१.१ :- बी. एड्.** प्रशिक्षणापूर्वी आणि शिक्षणानंतर स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

परिकल्पना क्रमांक **१.१ :- बी. एड्.** व प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात काही फरक दिसून येतो तो फरक लक्षणीय आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी tमूल्याचा वापर करण्यात आला. त्यासंदर्भातील माहिती सारणी क्रमांक. २ मध्ये दिली आहे.

सारणी क्रमांक. २
**बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे मध्यमान, प्रमाणविचलन व t मूल्य दर्शविणारी सारणी.**

| अभ्यास गट | संख्या (N) | मध्यमान (M) | प्रमाणविचलन (S.D.) | tमूल्य | प्राप्त tची सार्थकता / असार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| स्त्री प्रशिक्षणापूर्वी | ३० | १४६.५ | ११.४० | ५.९३ | सार्थक (०.०५) |
| स्त्री प्रशिक्षणानंतर | ३० | १६८.१६ | १६.४६ | | सार्थक (०.०१) |

०.०५ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य - २.०४
०.०१ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य - २.७६

अर्थनिर्वचन :-

सारणी क्रमांक २ नुसार बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे प्राप्त tमूल्य ५.९३ आहे.

०.०५ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df) २९ करिता नमुना tमूल्य २.०४ आहे. प्राप्त tमूल्य (५.९३) हे नमुना tमूल्यपेक्षा अधिक असल्याने प्राप्त tमूल्य सार्थक आहे.

तसेच ०.०१ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df)२९ करिता नमुना tमूल्य २.७६ आहे. प्राप्त tमूल्य (५.९३) हे नमूना tमूल्यपेक्षा अधिक असल्याने प्राप्त tमूल्यसार्थक आहे.

परिकल्पना परीक्षण :-

०.०५ व ०.०१ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्यपेक्षा प्राप्त tमूल्य अधिक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग केला.

निष्कर्ष :-

बी. एड्. प्रशिक्षणामुळे स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीत वाढ होते.

उद्दिष्ट क्रमांक १.२ :- **बी. एड्.** प्रशिक्षणापूर्वी आणि शिक्षणानंतर पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

परिकल्पना क्रमांक १.२ :- **बी. एड्.** व प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात काही फरक दिसून येतो तो फरक लक्षणीय आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी t मूल्याचा वापर करण्यात आला. त्यासंदर्भातील माहिती सारणी क्रमांक. ३ मध्ये दिली आहे.

सारणी क्रमांक ३

**बी. एड्.** प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे मध्यमान, प्रमाणविचलन व tमूल्य दर्शविणारी सारणी.

| अभ्यास गट | संख्या (N) | मध्यमान (M) | प्रमाणविचलन (S.D.) | tमूल्य | प्राप्त tची सार्थकता / असार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष प्रशिक्षणापूर्वी | ३० | १५६.८ | १६.९७ | ३.१९ | सार्थक (०.०५) |
| पुरुष प्रशिक्षणानंतर | ३० | १६८.८४ | ११.७७ | | सार्थक (०.०१) |

०.०५ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य २.०४
०.०१ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य २.७६

अर्थनिर्वचन :-

सारणी क्रमांक ३ नुसार बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी आणि प्रशिक्षणानंतर पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे प्राप्त tमूल्य ३.१९ आहे.

०.०५ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df) २९ करिता नमुना tमूल्य २.०४ आहे. प्राप्त tमूल्य (३.१९) हे नमुना t मूल्य (२.०४) पेक्षाअधिकअसल्याने प्राप्त tमूल्य सार्थक आहे.

तसेच ०.०१ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df)२९ करिता नमुना tमूल्य २.७६ आहे. प्राप्त tमूल्य (३.१९) हे नमूना tमूल्य (२.७६) पेक्षा अधिक असल्याने प्राप्त tमूल्यसार्थक आहे.

परिकल्पना परीक्षण :-

०.०५ व ०.०१ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य हे नमुना t मूल्यापेक्षा जास्त असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग केला.

निष्कर्ष :-

बी. एड्. प्रशिक्षणामूळे पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीत वाढ होते.

उद्दिष्ट क्रमांक १.३ :- **बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी स्त्री व पुरुष विद्यार्थी** शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
परिकल्पना क्रमांक **१.३ :- बी. एड्.** प्रशिक्षणापूर्वी स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.

बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात काही फरक दिसून येतो तो फरक लक्षणीय आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी tमूल्याचा वापर करण्यात आला. त्यासंदर्भातील माहिती सारणी क्रमांक ४ मध्ये दिली आहे.

सारणी क्रमांक ४

**बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे मध्यमान, प्रमाणविचलन व tमूल्य दर्शविणारी सारणी.**

| अभ्यास गट | संख्या (N) | मध्यमान (M) | प्रमाणविचलन (S.D.) | tमूल्य | प्राप्त tची सार्थकता / असार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| स्त्री प्रशिक्षणापूर्वी | ३० | १४६.५ | ११.४० | १.८६ | असार्थक (०.०५) |
| पुरुष प्रशिक्षणापूर्वी | ३० | १५६.८ | १६.९७ | | असार्थक (०.०१) |

०.०५ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य - २.००
०.०१ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य - २.६६

अर्थनिर्वचन :-

सारणी क्रमांक ४ नुसार बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे प्राप्त tमूल्य १.८६ आहे.

०.०५ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df) ५८ करिता नमुना tमूल्य २.०० आहे. प्राप्त tमूल्य (१.८६) हे नमुना tमूल्य (२.००) पेक्षा कमी असल्याने प्राप्त tमूल्य असार्थक आहे.

तसेच ०.०१ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा df ५८ करिता नमुना t मूल्य २.६६ आहे. प्राप्त t मूल्य(१.८६) हे नमुना t मूल्यापेक्षा कमी असल्याने प्राप्त t मूल्यअसार्थक आहे.

परिकल्पना परीक्षण :-

०.०५ व ०.०१ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य हे नमुना tमूल्यापेक्षा कमी असल्याने शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला.

निष्कर्ष :-

बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या शिक्षकी पेशाविषयीचा दृष्टिकेनाचे प्रमाण सारख्येच आहे.

उद्दिष्ट क्रमांक १.४ :- **बी. एड्. प्रशिक्षणानंतर स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा अभ्यास करणे.**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014 Available online at www.aygrt.isrj.net

**परिकल्पना क्रमांक १.४ :- बी. एड्. प्रशिक्षणानंतर स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळत नाही.**

बी. एड्. प्रशिक्षणानंतर स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात काही फरक दिसून येतो तो फरक लक्षणीय आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी tमूल्याचा वापर करण्यात आला. त्यासंदर्भातील माहिती सारणी क्रमांक ५ मध्ये दिली आहे.

सारणी क्रमांक ५

**बी. एड्. प्रशिक्षणानंतर स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे मध्यमान, प्रमाणविचलन व tमूल्य दर्शविणारी सारणी.**

| अभ्यास गट | संख्या (N) | मध्यमान (M) | प्रमाणविचलन (S.D.) | tमूल्य | प्राप्त tची सार्थकता/ असार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| स्त्री प्रशिक्षणानंतर | ३० | १६८.१६ | १६.४६ | ०.२४ | असार्थक (०.०५) |
| पुरुष प्रशिक्षणानंतर | ३० | १६८.८४ | ११.७७ | | असार्थक (०.०१) |

०.०५ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य - २.००
०.०१ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्य - २.६६

अर्थनिर्वचन :-

सारणी क्रमांक ५ नुसार बी. एड्. प्रशिक्षणानंतर स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचे प्राप्त tमूल्य ०.२४ आहे.

०.०५ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df) ५८ करिता नमुना tमूल्य २.०० आहे. प्राप्त tमूल्य (०.२४) हे नमुना tमूल्य (२.००) पेक्षा कमी असल्याने प्राप्त tमूल्य असार्थक आहे.

तसेच ०.०१ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df)५८ करिता नमुना tमूल्य २.६६ आहे. प्राप्त tमूल्य (०.२४) हे नमुना tमूल्यापेक्षा कमी असल्याने प्राप्त tमूल्यअसार्थक आहे.

परिकल्पना परीक्षण :-

०.०५ व ०.०१ सार्थकता स्तरावर नमुना tमूल्यापेक्षा प्राप्त tमूल्य कमी असल्याने शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला.

निष्कर्ष :-

बी. एड्. प्रशिक्षणानंतर स्त्री व पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या शिक्षकी पेशाविषयीच्या दृष्टिकोनात सारख्याच प्रमाणात वाढ झाली आहे.

एकत्रित निष्कर्ष :-

१) बी. एड्. प्रशिक्षणामुळेविद्यार्थीशिक्षकांच्याअध्यापन अभिवृत्तीत वाढ होते.

१.१ बी. एड्. प्रशिक्षणामूळे स्त्री विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीत वाढ होते.

१.२ बी. एड्. प्रशिक्षणामूळे पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीत वाढ होते.

१.३ बी. एड्. प्रशिक्षणापूर्वी स्त्री आणि पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या शिक्षकी पेशाविषयीच्या सकारात्मक दृष्टिकोनाचे प्रमाण सारखेच आहे.

१.४ बी. एड्. प्रशिक्षणानंतर स्त्री आणि पुरुष विद्यार्थी शिक्षकांच्या शिक्षकी पेशाविषयीच्या सकारात्मक दृष्टिकोनात सारख्याच प्रमाणात वाढ झाली आहे.